मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५२ पोटकलम २
इमारतीचे बांधकाम करणेस द्यावयाचा परवाना दाखला

# ग्राम पंचायत गोरसई - सावंदे, ता - भिवंडी, जि. ठाणे

जा. नं. : ग्रा. पं. पु. / वशी / ६०/०९

दिनांक : २२/५/२००९

श्री. / श्रीमती नियाजुल्लाह मेंहदी हसन व हबीबुल्ला मेंहदी हसन रा. भिवंडी जि. ठाणे.

यांसी कळविण्यात येते की, मौजे गोरसई - सावंदे, ता. भिवंडी, जि. ठाणे येथील जुने घर क्र. ______

सर्वे नं. ६२१७अ पै १ / ~~गावठाण सिटी सर्वे~~ नं. २३६१.०० चौ. मिटर क्षेत्रफळाच्या भुखंडावरील

बांधकाम करणे बाबतचा / ~~दुरुस्ती करणे बाबतचा~~ दि. १२/२/२००९ चा अर्ज दि. १२/२/२००९ रोजी मिळाला.
गोडाउन + R.C.C

सदर अर्जावर ग्राम पंचायत मासिक सभा दि. २०/५/२००९ मध्ये विचार विनिमय करुन ठराव क्र. ५ (२)

ने शासकिय खात्याच्या परवानगीस आधीन राहून, उपरोक्त अर्जानुसार खालील अटी / शर्तीवर बांधकाम

करण्यास हे ''ना हरकत परवाना'' पत्र देण्यात येत आहे.

१. मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८, कलम ५२, पोट कलम ३ अन्वये परवानगी मिळाल्यापासुन १ वर्षाचे आत वांधकामास सुरुवात करावी तसेच पोटकलम ४, ५, ६, च्या तरतुदीचे अनुपालन करणे आपलेवर बंधनकारक राहील.

२. बांधकाम करणेपुर्वी आवश्यक असलेली महसुल खात्याची परवानगी घेणे आवश्यक असुन स. नं. जागा एन. ए. (अकृषक) झालेशिवाय बांधकामास सुरवात करु नये.

३. कलम ५३ च्या तरतुदीचे संपूर्ण बंधन आपल्यावर राहील. त्या नुसार सांडपाण्याची योग्य व्यवस्था करणे. तसेच क्र./ व्ही.पी.एम./२६९०/२८६५/प्र. क्र. ३४३५/२२ ग्रामविकास विभाग/मंत्रालय १० जुलै १९९२ प्रमाणे शौचालय/ व सांडपाणी पक्के गटार नसल्यास रस्त्यावर आणता येणार नाही.

४. जागेच्या मालकी, वहीवाट संबंधी हरकत वा वाद निर्माण झाल्यास परवानगीस स्थगिती दिली जाईल व जोपर्यंत वाद मिटत नाही तोपर्यंत स्थगिती कायम राहील. सदर वादाचे निराकरण अर्जदाराने करावयाचे असून निराकरण झालेनंतर पंचायतीस कळविले पाहिजे व स्थगिती रद्द करणे बाबत परवानगी घेतले शिवाय बांधकाम करता कामा नये.

५. होणारे सर्व बांधकाम आपले मालकीच्या व वहीवाटीच्या जागेत करावयाचे असून छपराचे पडणाऱ्या पाण्यापासून कोणास त्रास होणार नाही याची दक्षता घेणेत यावी.

६. इमारतीच्या आंजूबाजूस प्लॅनमध्ये दाखविल्याप्रमाणे मोकळी जागा न सोडल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' रद्द करणेचा अधिकार ग्राम पंचायत ने राखून ठेवलेला आहे.

७. वांधकाम करताना, बांधकामासाठी वापरले जाणारे मटेरिअल अगर सामान या पासून नागरिकांच्या रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही, याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

८. इमारतीचे सांडपाणी व सेप्टीक टॅंक मधून येणारे सांडपाणी याची व्यवस्था अर्जदार यांनी स्वत: करावयाची आहे.

९. इमारतीचे वांधकाम पूर्ण झाल्यावर व सदरची इमारत निवासासाठी / व्यापारासाठी वापराकरिता योग्य असल्यावावत वास्तुविशारद यांचा दाखला ग्राम पंचायत ला सादर केल्याशिवाय व कर आकारणी केल्याशिवाय या इमारतीचा कुठल्याही प्रकारे वापर होणार नाही याची खबरदारी अर्जदार यांनी घ्यावयाची आहे.

१०. इमारतीचे वांधकाम करतांना कुठल्याही प्रकारचा गंभीर अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जवाबदारी अर्जदार यांचेवर राहील.

११. इमारतीचा वापर गोडाऊन म्हणून करावयाचा असल्यास अग्निशमन अधिकारी यांचेकडून ''गोडावूनसाठी योग्य'' असा दाखला प्राप्त झाल्याशिवाय इमारतीचा वापर करु नये.

१२. वांधकामास सुरुवात करण्यापूर्वी सात दिवस आगाऊ वांधकाम केव्हा सुरु करणार यावावत लेखी ग्राम पंचायत कार्यालयात कळवावे.

१३. परवानगीचे तारखेपासून एक वर्षाचे आत बांधकामास सुरुवात करावी. तशी सुरुवात न केल्यास सदर परवानगी र
समजावी व नविन परवानगीसाठी अर्ज दाखल करावा.

१४. ज्या ठिकाणी पाण्याची जलवाहिनी जात असेल त्याचे वर बांधकाम करता कामा नये. तसेच सदर जलवाहिनी पासून
(पाच) फूट अंतर सोडून बांधकाम करावे.

१५. गोडाऊन बांधकामा समोरील रस्ते हे सार्वजनिक पंचायतीचे मालकीचे राहतील हे अर्जदार यांना मान्य आहे असे समजून
हा ना हरकत परवाना दिला असे.

१६. गोडाऊन अगर इमारत यामध्ये कुठल्याही प्रकारचे स्फोटक द्रव्य पदार्थ व रसायन अथवा ज्यापासून विषारी वायू उत्प
होईल असे रसायन पदार्थ ठेवण्यात येऊ नये व अशा प्रकारचे पदार्थ अगर इतर साठा ठेवल्यास तो अनधिकृत समजू
त्या बाबत होणाऱ्या परिणामास अर्जदार स्वत: जबाबदार राहील.

१७. इमारतीचे अथवा गोडाऊनचे बांधकाम रस्त्यापासून १५ फूट मार्जीन सोडून बांधकाम करावे.

१८. तसेच आपण ज्या व्यक्तिस भाड्याने अथवा विकत दिलेल्या गाळ्यामध्ये वरिल प्रमाणे स्फोटक किंवा विषारी वायु
उत्पन्न होईल असा माल ठेवल्यास अर्जदार यांनी मनाई करावी. तसे न केल्यास भाडेकरु किंवा मालक जबाबदार राहील
तसेच गोडाऊन मध्ये कोणत्याही व्यवसाय करावयाचा असल्यास त्यासाठी ग्रामपंचायतीची पूर्व परवानगी घेण्यात यावी

१९. इमारतीचे/गोडाऊनचे बांधकाम पूर्ण झाल्यावर ग्राम पंचायत कराची आकारणी झाल्याशिवाय इमारतीचे किंवा गोडाऊ
किंवा गाळे भाड्याने देता कामा नये किंवा त्याची विक्री करता कामा नये.

२०. नकाश्यात (प्लॅनमध्ये) दर्शविल्याप्रमाणे बांधकाम करावे.

२१. अर्जात दर्शविल्याप्रमाणे ~~सव्हे नं~~ / स. नं. ६.२.१९.३.१५ ... ~~हि. नं.~~ १ ................ मधील जागेत सोबतच्या
नकाशाप्रमाणे
चौ. फुट मापाचे घर / इमारत / गोडाऊन / ............ मजली बांधणेस ना हरकत दाखला देणेत येत आहे.

२२. सोबतच्या प्लॅनला मे. मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचे कडील आगाऊ मंजूरी घेणेची जबाबदारी तुम्हांवर आहे. व राहिल.

२३. नियोजित बांधकामाच्या मजबुतीची जबाबदारी तुम्ही स्वत: मालक व तुमचे आर्किटेक यांचेवर आहे व राहिल. तसेच
बांधकामाशेजारी तुमच्याच जागेत २५ रोपे लावून ती वाढविणे तसेच शौचालयाची इमारत बांधण्याची जबाबदारी
आहे व राहील.

सोबतच्या नकाश्याच्या (प्लॅनाच्या) ....३....... प्रति पाठवित आहे.

२४) सोबतच्या नकाशाप्रमाणे A टाईपचे पत्राशेड बांधकाम व
B टाईप R.C.C. तळमजला+१ मजल्याचे बांधकाम करावे.

वरील अटीचा भंग केल्यास परवानगी (ना हरकत दाखला) रद्द करण्यांत येईल, व कलम ५२.
खाली होणाऱ्या कार्यवाहिस पात्र राहावे लागेल. याची नोंद घ्यावी.

दिनांक : २१ / ५ / २००९

ग्राम विकास अधिकारी
ग्रुप ग्राम पंचायत गोरसई-सावंदे
ता. भिवंडी जि. ठाणे

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत गोरसई-सावंदे
ता भिवंडी, जि ठाणे.